शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तक्रार अर्ज क्रं. ०१/२०२१

| | | |
|---|---|---|
| श्री. सतेज महादेव दणाणे<br>मु.लोंढे-मोहितेवाडी, ता.माळशिरस,<br>जि.सोलापूर. | } | तक्रारदार |
| विरूध्द् | | |
| १. श्रीराम एज्युकेशन सोसायटी, फलटण<br>जि.सातारा<br>२. नामदेवराव सुर्यवंशी (बेडके) महाविद्यालय, फलटण<br>जि.सातारा | } | वि. प |

श्रीराम एज्युकेशन सोसायटी फलटण, जि.सातारा या शिक्षण संस्थेचे नामदेवराव सुर्यवंशी (बेडके) महाविद्यालय, फलटण यांचेकडील तक्रारदार शिक्षक श्री. सतेज महादेव दणाणे यांनी दि.०८/०२/२०२१ रोजी तक्रार निवारण समितीकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जात नमूद तक्रार पुढीलप्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

माझी दि.२५ ऑक्टोंबर २०१३ रोजीच्या विद्यापीठ निवड समिती मार्फत नामदेवराव सुर्यवंशी (बेडके) महाविद्यालय फलटण मध्ये मराठी विषयाच्या सहा.प्राध्यापकपदी निवड झाली असून संस्थेच्या जावक क्र.SRES/PC/592/0/2013/14 date 03/03/2014 रोजीच्या नियुक्ती आदेशानुसार दि.०३/०३/२०१४ रोजी महाविद्यालयात रूजू झालो. महाविद्यालयात रूजू झाल्यापासून मला शासन नियमानुसार वेतन देण्यात आले नाही तसेच माझी स्थाननिश्चिती करण्यात आली नाही व त्याचे लाभ मिळाले नाहीत त्यासंदर्भात मा.प्र.प्राचार्य व संस्था अध्यक्ष यांना विनंती अर्जाव्दारे दाद मागून ही त्यांनी दखल घेतली नाही. तरी मला रूजू दिनांकापासून शासन नियमानुसार वेतन व स्थान निश्चितीचे सर्व लाभ मिळावेत ही नम्र विनंती.

**संस्थेचा अभिप्राय :**

तक्रारीबाबत संस्थेकडून दि.२४ मार्च २०२३ रोजी म्हणणे सादर करण्यात आले.

१. आमचे संस्थेतर्फे चालविणेत येणारे नामदेवराव सुर्यवंशी महाविद्यालय, फलटण हे सन २००४ पासून कायम विनाअनुदानित तत्वावर महाराष्ट्र शासनाकडून मान्यता घेवून चालविणेत येते आहे. सदर

महाविद्यालयामध्ये कला व वाणिज्य शाखा कार्यरत असून फलटण सारख्या ग्रामीण भागामध्ये आमचे महाविद्यालयामुळे तेथील व आसपासच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय निस्वार्थपणे निर्माण करून दिली आहे.

२. सदर महाविद्यालय व श्री. दणाणे यांची नेमणूक करताना केलेली जाहिरात प्रक्रिया आणि नेमणूकीची कागदपत्रे सोबत जोडली असून त्यावरून हे दिसून येईल की, श्री.दणाणे यांची नेमणूक कायम विनाअनुदानित तत्वावर झालेली आहे. सबब जाहिरातीस अनुसरूनच अर्ज सादर करताना सदर महाविद्यालय संपुर्णपणे विना अनुदानित असलेची कल्पना श्री.दणाणे यांना होती. व त्यास अनुसरूनच त्यांनी नोकरीसाठी आमचे संस्थेच्या महाविद्यालयाकडे अर्ज केला होता. सबब, त्यांना सदर महाविद्यालयाबाबत व पदाबाबत व त्यांच्या विनाअनुदानित असण्याबाबत संपुर्ण कल्पना होती.

३. सदर विनाअनुदानित तत्वावरील पदामुळे आमचे महाविद्यालयाने श्री दणाणे यांना आपलेकडे शिवाजी विद्यापीठाने ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे प्राप्त होणा-या फी मधून महाविद्यालयाच्या सर्व खर्चाचा विचार करून योग्य ते वेतन देत आलेले आहेत. सदर वेतन त्या त्या शिक्षकांच्या बँक खातेवर सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा फलटण येथ दरमहा जमा केले जाते त्याचा बिनशर्त स्विकार श्री. दणाणे यांनी आजतागायत केलेला आहे. तसेच त्यांचा प्राव्हिडंट फंड नियमानुसार भरला जात आहे. त्यामुळे आता वेतनाबाबत त्यांची कोणतीही तक्रार प्रिन्सीपल ऑफ इस्टोपल नुसार ग्राहय धरता येणार नाही.

४. आम्हाला मिळणा-या फी बाबत आम्ही वेळोवेळी विद्यापीठाकडे फी वाढ करणेची मागणी करत आलेलो आहोत त्याबाबतची कागदपत्रे सोबत जोडली आहेत. परंतू त्याबाबत शिवाजी विद्यापीठाने आम्हांला योग्य ती फी वाढ करून दिली नसल्याने महाविद्यालयाला मिळणा-या फी मध्ये चालविणे आर्थिक दृष्टया अडचणीचे व जिकिरीचे ठरत आहे. या म्हणणे सोबत आम्ही महाविद्यालयाचे गेल्या वर्षाचा (सन २०२१-२२) ऑडिट रिपोर्ट सादर करत असून त्यावर महाविद्यालय आम्ही तोटयात चालवत असलेचे दिसून येईल.

५. श्री.दणाणे यांनी त्यांचे तक्रारीत शासन नियमाप्रमाणे वेतनाची मागणी केलेली आहे. परंतू त्यांना लागू असणारे शासन नियम कोणते? आम्ही दिलेले वेतन व त्यांना मिळणा-या वेतनामध्ये कोणता व कसा फरक पडला? याची कोणतीही स्पष्टता केली नसलेने त्यांचा अर्ज फेटाळून लावणेत यावा.

६. तसेच श्री.दणाणे यांना त्यांनी स्थान निश्चिती केव्हा, कशी, कोणत्या पदी करावयाची होती व त्यास ते पात्र होते किंवा कसे याची देखील स्पष्टता अर्जामध्ये केलेली नाही. या कारणास्तव स्थान निश्चितीबाबत विचार करता येणार नाही. श्री.दणाणे यांनी स्थाननिश्चितीसाठी दि.२५/०१/२०२१ रोजी

अर्ज केला होता. पण त्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेने त्याचा विचार झाला नाही. श्री.दणाणे यांचा अर्ज व आमचे उत्तर या स्पष्टीकरणासाठी जोडले आहे.

७. वेतन मागणीबाबत आम्ही मा.शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांचेकडे दि.१६/०८/२००७ चे पत्र जोडत असून त्यावरून हे स्पष्ट आहे की, विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणा-या शुल्कातून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना वेतन व भत्ते देणेचे सदर पत्रात स्पष्टपणे नमूद आहे.

८. थोडक्यात आम्ही श्री.दणाणे यांचे वेतन व स्थाननिश्चितीबाबत केलेली कार्यवाही ही योग्य व कायदेशीर आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी अशा प्रकारे महाविद्यालय तोटयात का असेना पण ते चालू रहावे या उदात्त हेतूने केलेले आहे. आमचे महाविद्यालय फलटण एस.टी.बस स्टॅण्ड जवळ असलेने जास्ती संख्येने ग्रामीण भागातील मुली व मागास विद्यार्थी प्रवेश घेतात. त्यामुळे आमचे महाविद्यालय हे एक सामाजिक समता प्रस्तापित होणेचे साधन असण्याचे याच बांधिलकीतून चालवत आहोत.

श्री.दणाणे यांनी आपले सहा.प्राध्यापक पदाच्या नेमणूकीच्या दिनांकानंतर म्हणजेच आठ वर्षापेक्षा जास्त कालावधी ओलांडल्यानंतर संस्थेला व महाविद्यालयाला केवळ त्रास देण्याच्या हेतूने शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार दाखल केलेचे स्पष्ट दिसून येते. सबब उपरोक्त सर्व मुद्यांचा विचार करून श्री.दणाणे यांची तक्रार नामंजूर करणेत यावी.

**समितीची निरिक्षणे :**

**१.** संस्थेने दि.२४/०३/२०२३ रोजीच्या निवेदनामध्ये 'सदर तक्रार अर्ज नियमाप्रमाणे तक्रारदार यांनी प्रथम संस्थेकडे देवून त्यांच्या अभिप्रायासह तक्रार निवारण समिती समोर सादर केलेला नाही. त्यामुळे सदर अर्जाचा विचार करता येणार नाही व या कारणास्तव सदर अर्ज फेटाळुन लावण्यात यावा' अशी विनंती मा.अध्यक्ष, तक्रार निवारण समिती यांना केली आहे.

उपरोक्त संस्थेच्या निवेदनाबाबत समितीसमोरील तक्रार अर्जाबाबत झालेल्या सुनावणी तारखा व त्यांचे प्रोसीडींग विचारात घेणे आवश्यक आहे. तक्रारदार यांनी दि.०८/०२/२०२१ रोजी तक्रार निवारण समितीकडे तक्रार अर्जाची अग्रीम प्रत पाठवली. त्यानंतर दि.१०/०२/२०२१ रोजी तक्रारदार यांनी सब पोस्टमास्टर, मार्केट यार्ड, पोस्ट ऑफिस फलटण, सहा.अधिक्षक डाकघर फलटण यांना पाठवलेली पत्रे तसेच मा. अध्यक्ष, तक्रार निवारण समिती यांचे नावे तक्रार निवारण अर्ज प्र. प्राचार्य कडून मागवून घेण्याबाबत दि.११/०२/२०२१ रोजीचे प्राप्त पत्र, अवलोकनी घेतले. त्यावर तक्रार निवारण कक्षाकडून प्राचार्य, नामदेवराव सुर्यवंशी (बेडके) महाविद्यालय, फलटण यांना तक्रारदार यांनी

अग्रीम तक्रार अर्ज या कक्षाकडे दाखल केला असून अर्जाची मुळप्रत व ९ झेरॉक्स प्रती व डीडी (धनादेश) संस्था/ महाविद्यालयाच्या अभिप्रायाकरिता पाठविले आहे तरी तक्रार अर्ज व त्यांचे झेरॉक्स प्रती अभिप्रायासह कक्षाकडे पाठविणे परिनियम ३२८ च्या तरतुदीनुसार बंधनकारक आहे, सबब तक्रारदार यांचा तक्रार अर्ज झेरॉक्स प्रती व अभिप्रायासह कक्षाकडे तात्काळ पाठवण्याबाबत दि. १८/०३/२०२१ रोजीच्या पत्राने कळविलेचे दिसून येते. त्यावर सहा.कुलसचिव, तक्रार निवारण कक्ष यांना महाविद्यालयाचे विभागप्रमुख मानसशास्त्र विभाग डॉ.डी.आर.राऊत यांनी त्यांची निवड स्थानिक निवड समिती व विद्यापीठ निवड समितीमार्फत निवड झाली नसल्याने मला सहीचे अधिकार नाहीत असे दि.३०/३/२०२१ च्या पत्राने कळविले आहे.

संस्थेच्या ऑनररी जनरल सेक्रेटरी यांनी तक्रारदार यांना दि.२०/०३/२०२१ रोजीच्या पत्राने, 'आपल्या महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य श्री. दिपक रामचंद्र राऊत यांना संस्थेने प्रभारी प्राचार्य म्हणून नेमणूक दिलेली आहे. सदर नेमणूकीस शिवाजी विद्यापीठाची मान्यता नसल्यामुळे त्यांना शासकीय कार्यालयाकडे प्रभारी प्राचार्य म्हणून आपल्या सेवकांच्या कागदपत्रावर सहया करून प्रस्ताव पाठविता येत नाहीत. परंतू संस्थेने श्री. दिपक राऊत यांना प्रभारी प्राचार्य ची नेमणूक दिलेली असल्याने त्यांना संस्था अंतर्गत व्यवहारावर सह्या करण्याचे अधिकार संस्थेने दिलेले आहेत. यापूढे आपला कोणताही शालेय पत्रव्यवहार हा मा. प्रभारी प्राचार्य त्यांच्या शिफारशीने संस्थेकडे अथवा इतर कार्यालयाकडे झाला पाहिजे मा. प्राचार्यांच्या शिफारशी शिवाय केलेला पत्रव्यवहार अनाधिकृत असल्यामुळे त्याची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी असे कळविल्याचे दिसून येते. उपरोक्त बाबी नमूद केलेनुसार संस्था, महाविद्यालयाने तक्रारदार यांच्या तक्रार अर्जाच्या प्रती तक्रार निवारण कक्षाकडे अभिप्रायास पाठविलेल्या नाहीत.

यानंतर सदर तक्रार सुनावणी पटलावर आल्यानंतरही ऑनररी जनरल सेक्रेटरी यांनी ७१३/२०२२-२०२३ दि.२७/०६/२०२२ रोजीच्या पत्र अवलोकनी घेता त्यामध्ये त्यांनी तक्रारदार यांनी तक्रार अर्ज दाखल केलेची प्रत संस्थेस मिळाली नसल्याने म्हणणे देता येत नसल्याचे कळविले आहे. तक्रारदार यांनी तक्रार अर्जाची मुळ प्रत व झेरॉक्स प्रती रजिस्टर ए.डी ने महाविद्यालयाकडे पाठविले असलेबाबत शपथपत्र समितीसमोर सादर दाखल केले आहे. उपरोक्त वस्तुस्थिती वरून संस्था, महाविद्यालयाचा गलथानपणा दिसून येतो. समितीकडून या प्रकरणाच्या सुनावणीवेळी संस्थेस तक्रार अर्जाची प्रत देण्यात आली. संस्थेकडून दि.२४/०३/२०२३ रोजी तक्रारीबाबत म्हणणे दाखल करण्यात आले. सबब संस्थेच्या निवेदनामध्ये 'सदर तक्रार अर्ज नियमाप्रमाणे तक्रारदार यांनी प्रथम संस्थेकडे देवून त्यांच्या अभिप्रायासह तक्रार निवारण समिती समोर सादर केलेला नाही. त्यामुळे सदर अर्जाचा विचार करता येणार नाही व या कारणास्तव सदर अर्ज फेटाळुन लावण्यात यावा' असे म्हणणे चुकीचे ठरते.

२. तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रारीच्या पृष्ठार्थ दि.०३/०३/२०१४ रोजीचा नियुक्ती आदेश जोडला आहे. या आदेशानुसार तक्रारदार यांची नामदेवराव सुर्यवंशी (बेडके) कॉलेज फलटण येथे (१५६००-३९१०० AGP ६०००) पे स्केलवर मराठी सहाय्यक प्राध्यापक पूर्णवेळ नियुक्ती केल्याचे दिसून येते. तथापि शासन नियमानुसार वेतन देण्यात येत नसल्याचे तक्रारदार यांनी तक्रार केली आहे. त्याच्या पुष्ठार्थ तक्रारदार यांनी प्राचार्य व अध्यक्ष यांना लिहीलेली अनुक्रमे दि.१४/०१/२०२१, दि.२८/०१/२०२१, दि.०१/०२/२०२१ या तारखेची वेतन व स्थाननिश्चिती करणेबाबत संस्था/ महाविद्यालय यांना कळविल्याचे पत्रे जोडली आहेत. तथापि तक्रारदार यांनी संस्था, महाविद्यालयाकडून त्यांना सद्यस्थितीत मिळत असलेले वेतन व अपेक्षित वेतनामधील फरक याची स्पष्टता केलेली नाही.

संस्थेच्या दि. २४/०३/२०२३ रोजीच्या लेखी म्हणणे/निवेदनामध्ये तक्रारदार यांची नेमणुक कायम विनाअनुदानित तत्वावर झाली असून सदर महाविद्यालय संपूर्णपणे विनाअनुदानित असल्याची संपूर्ण कल्पना तक्रारदारांना होती व त्यानुसार त्यांनी नोकरीसाठी अर्ज केला होता. तसेच सदर विनाअनुदानित तत्वावरील पदामुळे तक्रारदार यांना शिवाजी विद्यापीठाने ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे प्राप्त होणाऱ्या फी मधून महाविद्यालयाच्या सर्व खर्चाचा विचार करून योग्य ते वेतन देत आहेत. सदर वेतन त्या त्या शिक्षकांच्या बँक खातेवर सेंन्ट्रल बँक ऑफ इंडिया शाखा फलटण, येथे दरमहा जमा केली जाते. त्याचा बिनशर्त स्विकार तक्रारदार यांनी आजतागायत केलेला आहे. तसेच त्यांचा प्रॉव्हिडंट फंड नियमानुसार भरला जात आहे. त्यामुळे त्यांच्या वेतनाबाबत त्यांची कोणतीही तक्रार प्रिन्सिपल ऑफ इस्टोपल बाय कंडक्ट नुसार ग्राहय धरता येणार नाही. सबब कोणत्या शासन नियमानुसार तक्रारदार वेतन मागत आहे किंवा त्यांच्या वेतनामध्ये कोणता व कसा फरक पडला यांची स्पष्टता झालेली नाही.

दोन्ही पक्षाचे कागदपत्रे व म्हणणे विचारात घेता समिती या निष्कर्शास येते की, संस्थेने तक्रारदार यांना दिलेल्या नियुक्ती आदेशामध्ये नमूद केल्यानुसार वेतन व त्या अनुषंगाने असणारे इतर फायदे तक्रारदार यांना देणे बंधनकारक आहे.

३. तक्रारदार यांनी त्यांची स्थाननिश्चिती करण्यात आली नसून त्याचे लाभ मिळाले नसल्याची तक्रार केली आहे. याबाबत संस्थेने तक्रारदार यांची स्थाननिश्चिती केव्हा, कशी, कोणत्या पदी करावयाची होती व त्यास ते पात्र होते किंवा कसे याची देखील स्पष्टता अर्जामध्ये नसल्याने त्याचा विचार करता येणार नाही. दि.२५/०१/२०२१ रोजी तक्रारदार यांनी स्थाननिश्चिती साठी अर्ज केला होता परंतु त्या करिता आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेने त्याचा विचार झाला नाही असे संस्थेने समितीसमोर लेखी म्हणणे सादर केले आहे.

तक्रारदार यांनी तक्रार अर्जासोबत वेतन व स्थाननिश्चितीकरिता केलेला पत्रव्यवहार जोडला आहे. तक्रारदार अथवा संस्था महाविद्यालय यांनी स्थाननिश्चिती प्रस्तावाबाबत कागदपुरावा जोडलेला

दिसून येत नाही. सबब तक्रारदाराच्या तक्रारी अनुषंगाने शिवाजी विद्यापीठ कायदा १९७४ अंतर्गत तयार केलेले परिनियम १९७ (ह) नुसार संबधित कॉलेजचे प्राचार्य हे पत्रव्यवहारास जबाबदार असतात. विद्यापीठाच्या २९ मे २०१० च्या परिपत्रकानुसार प्राचार्यानी संबधित शिक्षकाचे स्थाननिश्चितीचे प्रस्ताव विद्यापीठ कार्यालयाकडे विनाविलंब पुढील कार्यवाहीकरिता पाठविणे आवश्यक आहे. सबब तक्रारदार कॅस नियमाअंतर्गत पात्र होत असलेस व अनुषंगीक शर्ती व अटींची पुर्तता करित असलेस प्राचार्य यांनी तक्रारदार यांचा स्थाननिश्चितीचा प्रस्ताव विद्यापीठ कार्यालयाकडे वेळेत पाठविणे बंधनकारक आहे. उपरोक्त बाबी अवलोकनी घेता समिती खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांना त्यांच्या नेमणुक आदेशामध्ये नमूद केले नुसार संस्था, महाविद्यालय यांनी वेतन अदा करावे व त्याची फरक/थकबाकी तक्रार दाखल तारखेपुर्वी तीन वर्षापासून देण्यात यावी.

२. संस्था, महाविद्यालयाने तक्रारदार यांच्या पात्रतेनुसार त्यांचा स्थाननिश्चितीचा प्रस्ताव त्रुटी पुर्तता करून विनाविलंब पुढील कार्यवाहीकरिता विद्यापीठाकडे सादर करावा.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

दिनांक : 24 AUG 2023

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे )

सदस्य
(डॉ.एस.एस.महाजन)

सदस्य
(डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच. कोलेकर )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)